Review Of Research
Vol. 3 | Issue. 12 | Sept. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# जयंत नारळीकरांच्या “यक्षांची देणगी” कथासंग्रहामधील विज्ञानाचे स्वरूप

**प्रा.डॉ. राजेंद्र खंदारे**
**सहयोगी प्राध्यापक , स.म.शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते.**

**प्रस्तावना :**

स्वतंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यामध्ये नवे नवे प्रवाह निर्माण झाले. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, प्रादेशिक साहित्य, देशी साहित्य, जनवादी साहित्य हे सर्व साहित्यप्रवाह जीवनवादी आहेत. मानवी जीवन, जीवनातील समस्य, मानवी मन याविषयी गुंता उकलण्याच्या प्रेरणेतून साहित्य जन्माला आलेले आहेत.

धार्मिक कल्पना रूचकर स्वरूपात मांडण्याचे कार्य संत साहित्याने केले. इतिहास म्हणजे इसवीसने आणि तहाची कलमे म्हणून इतिहासाकडे दुर्लक्ष करणारा वाचक कांदबऱ्याच्या रूपाने व्यक्त झालेला इतिहास मात्र आवडीने वाचतो हीच गोष्ट विज्ञान साहित्याच्या बाबतीत का लागू पडू नये? विज्ञान जर लोकांपर्यत पोहचवायचे असेल तर अद्‌भूतरम्यता कल्पना यांचा आधार घेऊन विज्ञान साहित्य निर्माण झाले असे म्हणता येईल.

भक्कम शास्त्रीय पुरावा आणि बुद्धिनिष्ठ अंदाज यांच्या साह्याने विज्ञान ज्यामार्गाने जाऊन सत्याचा शोध घेते त्या मार्गाचा आदर बाळगून मराठीतील विज्ञान साहित्य निर्माण झाल्याचे दिसून येते. विज्ञान साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून उभे केलेले ‘विश्व’ जरी काल्पनिक, अद्‌भूतरम्य असले तरी ते विश्व अर्थशून्य असते असे म्हणता येणार नाही. आहे कडून जर कडे जाणारा प्रवास विज्ञान साहित्याचा आहे. वर्तमानकालीन वास्तव भविष्यकाळात कसे असेल, भारतीय मनावर कोणता परिणाम घडवू शकेल? या प्रश्नांच्या जिज्ञासेपोटीय विज्ञान साहित्याची निर्माण झाले असे म्हणता येईल. आणि वाचकांडून वाचले जाते याचाच अर्थ विज्ञान साहित्यामध्ये कारण-कार्य महत्वाचे आहे.

प्लेटो आपल्या ‘टीकाशास्त्र’ याग्रंथात म्हटले आहे की, “जे अशक्य आहे पण असंभवनीय आहे ते चालेल पण जे केवळ शक्य आहे पण असंभवनीय आहे ते वाङ्‌मयात चालणार नाही.” म्हणजेच विज्ञान साहित्यामध्ये The impossible Probable याला विशेष महत्त्व आहे. ॲरिस्टॉटलच्या भूमिकेवरून विज्ञान साहित्याचे नेमके स्वरूप समजू शकेल.

‘विज्ञान साहित्य’ यामधील ‘साहित्य’ ही संज्ञा सर्जनशील साहित्य या अर्थाने येथे योजलेला आहे. सर्जनशील साहित्य ही वास्तवाची निर्मिती असते. विज्ञानातील एखाद्या सत्यावर, संशोधनावर कल्पना वा कलात्मकतेचा स्पर्श झाला की, आपोआप विज्ञाननिष्ठ होऊन ते कल्पित वास्तवावर आधारलेले असते. विज्ञान साहित्यातील कल्पकता ही भविष्यकालीन संभव्य वास्तवावर आधारलेली असते. विचार, भावना आणि विकार या तिन्हींचे स्थान विज्ञान साहित्यामध्ये अनन्यसाधारण आहे. या तिन्हीमध्ये समतोल जर साधून आविष्कार कलात्मक झाला तर ते खऱ्या अर्थाने विज्ञान साहित्य होऊ शकेल.

**विज्ञान साहित्याच्या विविध व्याख्या :** आयझॅक ॲसिमोव्ह यांच्यामते विज्ञान कथा ही भविष्यकाळात घडते, त्यातील विज्ञान हे आजच्या विज्ञानाचे प्रक्षेपण तरी असते किंवा नव्याने लागलेल्या शोधावर आधारित असते.”[१] ‘विज्ञान कथा ही मानव केंद्रीतच असावी. तिच्यात मानवी समस्यांचे आणि त्या समस्या समाधानकारक सोडविण्यासाठी मानवानेच शोधलेल्या मार्गाचे चित्रण असावे.

मात्र ती समस्या वा ती सोडविण्याचा उपाय हे विज्ञानाधिष्ठितच असावे.''[२] असे थिओडर स्टर्जन यांना वाटते. गर्न्सबॅक यांनी विज्ञान साहित्याची व्याख्या करताना म्हटले आहे की, ज्या सुरस ललित साहित्यात विज्ञानातील नवीन आविष्काराचा व्यक्ती, समाज, किंवा अखिल मानवजात यांच्या जीवनावर जीवनशैलीवर होणाऱ्या संभाव्य परिणामाचा आढावा घेतला आहे ते विज्ञान साहित्य होय.

ह्याचाच अर्थ आजच्या काळात आजच्या समाजाला विज्ञानाचा होत असलेला उपयोग दाखविणारी कथा किंवा कादंबरी म्हणजे विज्ञान साहित्य नव्हे तर आजच्या प्रचलित विज्ञानाचे भविष्यकाळात प्रक्षेपण करून त्या भाविष्यकाळात विज्ञानाप्रगतीचे स्वरूप कसे असू शकेल आणि त्याचा मानवी जीवनावर वैयक्तिकरित्या तसंच सामुहिकरित्या कोणता चांगला-वाईट परिणाम होऊ शकेल ह्याचे चित्रण केलेले असेल तरच ती विज्ञान कथा असू शकेल असे निरंजन घाटेंना वाटते.

या विविध व्याख्या डोळ्यासमोर ठेवून मराठीतील विज्ञान साहित्याचे स्वरूप निश्चित करता येईल. विज्ञान हे जरी वैश्विक स्वरूपाचे असले तरी विज्ञानावर आधारलेल्या साहित्याचे स्वरूप विशिष्ट प्रदेश मानवंश, विशिष्ट भाषा यांच्यांशी निगडीत आहे. मानवी समाज यामधील सुख-दुःख, जय-पराजय यांच्याशी नाते सांगणारे साहित्य असल्यामुळे या विज्ञान साहित्याचे मर्यादित स्वरूप आहे. विज्ञान साहत्यामध्ये साहित्यिकांच्या सांस्कृतिक, सामाजिक वारसाचे प्रतिबिंब विज्ञान साहित्यातून पडू लागले आहेत. भाषा, वंश आणि प्रदेश यांचा ठसा विज्ञान साहित्यातून उमटू लागलेला आहे. म्हणून विज्ञान हे वैश्विक असले तरी विज्ञान साहित्याचे स्वरूप हे सापेक्ष आहे असे म्हणता येईल.

विज्ञान क्षेत्रातील नव-नवीन संशोधन, नव्या संकल्पनेचा परिणाम मानवी जीवनावर होतो. मानवी जीवनावर होणारा परिणाम भारतीय मानसिकतेतून शोधण्याचा प्रयत्नातून विज्ञान साहित्य निर्माण झाले असा अनुमान काढता येईल.

**मराठी विज्ञान साहित्याचे स्वरूप :**

मराठी साहित्यातील एक उपेक्षित पण सकस असा साहित्य प्रवाह म्हणजे विज्ञान साहित्य असे मत निरंजन घाटे आपल्या निबंधातून नोंदवतात. यावरून मराठीतील विज्ञान साहित्य प्रवाहातील वेगळेपण ध्यानात येईल. मराठी विज्ञान साहित्याचा विचार करताना केवळ कथा, कादंबरी हे दोनच साहित्य प्रवाह डोळ्यासमोर उभे राहातात. पण या दोन प्रकारापुरतेच मार्यादित विचार न करता विज्ञान कविता, विज्ञान नाटक, संवादात्मक विज्ञान यांचाही समावेश असावा प्रा. भालबा केळकर यांनी 'अणू ज्ञानेश्वरी' या नावाचे एक अणुविज्ञानाची माहिती सांगणारे काव्य लिहिले तर मनोहर मोघे यांनी 'संवादातून विज्ञान' या पद्धतीचे लेखन करून मराठी विज्ञान साहित्यात नव्याने भर घातलेली दिसते.[३] नाटकाचा अपावाद वगळता कथा कादंबरी या दोन क्षेत्रात विज्ञान साहित्य विपुल प्रमाणावर निर्माण झाले आहे.

मराठीतील पहिलं विज्ञान साहित्य म्हणजे सन १८३३ मध्ये हरी केशवजी यांचे 'कॉन्व्हर्सेशन ऑन नॅचरल फिलॉसॉफी' या ग्रंथाचे अनुवाद केले. 'सिद्ध पदार्थविज्ञान शास्त्रविषयक संवाद' हे पुस्तक होय असे निरंजन घाटेंना वाटते.नंतर "केरळ कोळीळ " मध्ये काही लेखातून शास्त्र कमी पण मनोरंजन अधिक आले आहे.ज्याला विज्ञान कथा म्हणता येईल अशी पहिली कथा म्हणजे श्रीधर बाळकृष्ण रानडे यांची 'तारेचे रहस्य ' १९५५ मध्ये मनोरंजन या मासिकामधून छापून आली.

१९५० पर्यंत तुरळकपणे मराठी विज्ञान साहित्य लिहिले गेले.१९५५ नंतर मात्र मराठी विज्ञान कथेने अधिक जोर धरलेला दिसतो. १९५५ ते १९६० या काळातील अमेरिकन विज्ञान कथेचं सुवर्णयुग मानन्यात येते. त्याचाच परिणाम मराठीतील विज्ञान कथेवर होऊन विज्ञान कथेचं दालन समृद्ध होण्यास सुरूवात झाली. 'नवल', 'हंस', 'वाङ्मय शोभा' यासारख्या विज्ञान कथेला वाहिलेल्या नियतकालिकातून विज्ञान कथा प्रसिद्ध होऊ लागल्या. विज्ञान कथा वाचकप्रिय बनविण्याचा खरा मान भा.रा.भागवत यांच्याकडे जातो. त्यांनी ज्युलस व्हर्न आणि एच.जी.वेल्स यांच्या अनेक विज्ञान कथा मराठीत आणल्या. विज्ञान कथांना लोप्रियतेच्या शिखरावर पोहचविण्याचा मान त्यांनाच द्यावा लागेल. १९६०-१९६२ च्या काळात नारायण धारप या विज्ञान कथाकाराचा उदय झाला. 'नेनचिम', 'कालीगुंफा', 'गोग्रमचा चितार', 'गोग्रॅमचे पुनरागमन', 'कपटी कंदार' या विज्ञान कादंबऱ्यांबरोबर त्यांनी अनेक विज्ञान कथाही लिहिल्या. १९६५ नंतर शालापत्रक, धनंजय, निशाचर, व नाईटकिंग या मासिकातून प्रसिद्ध होऊ लागल्या. या मासिकांचे कार्य कधीच विसरता येत नाही.

**जयंत नारळीकरांच्या 'यक्षाची देणगी' मधील विज्ञानाचे स्वरूप :**

जयंत नारळीकर पूर्वकाळात जी विज्ञान कथा लिहिली गेली प्रेमभंग, सूड, जगाला संपवणारे विशिष्ट चौकटीतच विज्ञान कथा रेंगाळत राहिली. स्वतः जयंत नारळीकरांनी शास्त्रज्ञ असल्यामुळे त्यांच्या विज्ञान कथेने गूढ, रहस्य, अदभूतरम्यता आणि

भयकथा यापासून विज्ञानकथेला दूर ठेवले. या त्यांच्या कथालेखनापासूनच विज्ञानकथेची समीक्षा होऊ लागली. साहित्य संमेलनांनीदेखील या विज्ञान साहित्याची दखल घेतली. एकूणच १९६५ नंतर विज्ञान साहित्याने एक नवा सक्षम वाचक वर्ग निर्माण केला.

विज्ञान हे जिज्ञासातून निर्माण झाले. विज्ञानमुळे अनाकलनीय गोष्टी समजायला मदत झाली. त्याचप्रमाणे पृथ्वीबाहेरील अफाट अंतराळात ज्या घटना घडतात आणि ज्यांचे आकलन विज्ञानानाद्वारे झालेले आहे. अशा घटना पृथ्वीवर घडल्या तर सामान्य माणसाला त्या अनाकलनीय वाटतात.प्रगत जीवसृष्टीला गणकयंत्राचा वापर करणे जरूरीचे वाटणार कारण दैनंदिन जीवनातील अनेक कामे ही यंत्रे चोखपणे करतात म्हणून **'यक्षाची देणगी'** जर' या कथेतून सुरूवातीची खोलीभर व्यापलेली बोजड गणकयंत्रे जाऊन पॉकेट कॅल्क्युलेटर्स आले व पुढील पिढीत याहून सुक्ष्म गणकयंत्रे तयार होतील असे सांगितले आहे. तर **'उजव्या सोंडेचा गणपती'** या कथेतून मूलकणामध्ये असलेल्या स्पिनमुळे अवकाशात पीळ निर्माण होऊ शकेल अशी गणितीय कल्पना ॲशर पेरेस आणि इतर काही गणिततज्ञांनी मांडली आहे. तिचा वापर या कथेत केला आहे. कृष्णविवर या कथेत एखादी मोठी वस्तू स्वतःच्या गुरुत्वाकर्षणामुळे संकुचित होत गेली तर एक परिस्थिती अशी निर्माण होईल, की ती वस्तूच बाहेरून दिसेनाशी होते. कारण त्या वस्तूच्या पृष्ठीभागावरचे गुरुत्वाकर्षण इतके प्रचंड असते की, त्यामुळे प्रकाशसुद्धा त्या वस्तुकडे खेचला जातो. अशा वस्तूला **'कृष्णविवर'**असे म्हणतात. पृथ्वी संकोच पावत तिचा व्यास सेंटीमीटरपेक्षाही कमी झाल्यास तिचे 'कृष्णविवर' होईल ही कल्पना या कथेत मांडली आहे. गंगाधर पंताचे पानिपत या कथेत कॅटॅस्ट्रॉफे थिअरी म्हणजे अकस्मात घडणारे बदल हा सिद्धांत सांगितलेला आहे. ठराविक कारणामुळे ठराविकच परिणाम होतील सुक्ष्म वस्तूंच्या व्यवहारात दिसत नाहीत. याच कारणामुळे एकाऐवजी अनेक संभाव्य गोष्टी घडू शकतात. प्रत्येक गोष्टीला साजेसे एक विश्व असून आपल्याला दर्शन या नात्याने एकच दिसते. **'धूमकेतू'** या कथेत धूमकेतू आणि सूर्यमालेतील इतर घटक आपल्या ठराविक कक्षेत गुरुत्वाकर्षणामुळे फिरणाऱ्या निर्जीव वस्तू आहेत. हे विज्ञानाने सिद्ध केलेले असले तरी अजून जन सामान्यांत त्यांच्या इष्ट आणि अनिष्ट शक्तीबद्दल बरेच गैरसमज होताहेत.**'पुनरागमन'**या कथेत पृथ्वीवर पूर्वी अतिप्रगत वसाहत असण्याची शक्यता अनेक विज्ञान कथालेखकांनी मांडली आहे. ही अतिप्रगत मानवजात हिमयुगासारख्या प्रचंड नैसर्गिक आपत्तीस तोंड देतादेता जवळ जवळ नामशेष झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही.**'दृष्टी आड सृष्टी'** या कथेत व्हायकिंग यानाने मंगळावरच्या पृष्ठभागाची वरवरची छाननी करून तिथे जीवसृष्टी नसेल असा निष्कर्ष काढला. परंतु पृष्ठभागाखाली एखादी अतिप्रगत जीवसृष्टी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. **'धोंडू'** या कथेत गेल्या काही वर्षात सूर्यमालेत भ्रमण करणाऱ्या आणि कधी कधी पृथ्वीवर येणाऱ्या मेटॅरॉईडस् पैकी काही दगड ग्रहाप्रमाणेच आकाशात फिरतात. कधी कधी ते पृथ्वीवर आदळतात त्याला मेटॅरॉईड म्हणतात. काहीमध्ये मोठे रासायनिक अणू सापडले त्यामुळे पृथ्वीपलिकडे, सूर्यापलिकडे विशाल प्रदेशात जीवसृष्टीला पोषक परिस्थिती असेल का? असा प्रश्न शास्त्रज्ञानांपुढे आहे. म्हणूनच या कथेत रासायनिक अणूपासून जीवसृष्टी आणि पुढे तिचा विकास होऊन उत्तम मेंदूची घडवणूक एखाद्या मेटॅरॉईड मध्ये होऊ शकेल का ? हा प्रश्न उपस्थित केला आहणे. पूत्रभवती भव या कथेत जीवसृष्टी कशी निर्माण होते हे विज्ञानाला कळायला लागले आहे. परंतु जो पर्यंत जनसामान्यात अंधश्रद्धा आहे तोपर्यंत अशा मूलभूत प्रश्नांची गुरुकिल्ली शास्त्रज्ञांना कळणे किती योग्य ठरेल. त्यापासून अनेक तोटेच होण्याची शक्यता आहे हे या कथेतून सांगितले आहे.**'ट्रॉयचा घोडा'**या कथेत एखादी आकाशगंगा, ॲंटीमॅटरची असण्याची शक्यता नाकारता येत नाही हे स्पष्ट केले आहे. **'नौलखाहायचे प्रकरण'** या कथेत टाईम मशनीप्रमाणे भविष्यात जर मानवी संस्कृती यंत्रावलंबी झाली तर तिची यंत्रे चालवायला सौरशक्तीकेंद्रे वापरत असेल तर ही शक्तीकेंद्रे बंद करणे हा एक भविष्यकालीन युद्धाचा प्रकार ठरेल. आणि ही युद्धे यांत्रिक चुकीमुळे होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एकूणच जयंत नारळीकरांच्या कथेत कल्पकता ही शास्त्रशुद्ध विज्ञानाला धरून आहे म्हणून त्यांच्या कथा विज्ञानातील सिद्धांताचे संभाव्य परिणाम शोधण्यात यशस्वी होताना दिसतात. विज्ञानातील सिद्धांत सामान्य वाचकांपर्यंत सहजपणे पोहचण्यासाठी पण तरीही विज्ञानसाहित्याच्या केंद्रस्थानी विज्ञान असून चालणार नाही. तर माणूस असला पाहिजे अशी सुबोध जावडेकरांची भूमिका महत्त्वाची ठरते.[३]

**विज्ञान कथेचे विशेष :**

१. कथेतील नाट्य, कथाबीज विज्ञानावर आधारित असले तरी ती माणसाच्या मनातील व्यापारावर, नातेसंबधावर प्रकाश टाकणारी विज्ञान कथा असतात.

२. विज्ञानाची भाषा नेमकी कमीत कमी शब्दांचा वापर करणारी असते.
३. विज्ञान कथेमध्ये बांधीवपणा असतो. अंतिम सत्याकडे जायची ओढ असते. पारखून घेत, प्रयोगातून सिद्ध करत पुढे जायची आस असते.
४. बदलत्या भोवतालच्या संघर्षाचे आणि परिणामांचे चित्रण विज्ञान कथेतेत येणे महत्त्वाचे ठरते.
५. विज्ञान आपणास सत्याच्या वाटेने नेते.
६. विज्ञान कथा म्हणजे भविष्यातील संभाव्य जीवनाचा आरसा आहे.
७. सामान्य दर्जाची विज्ञान कथा लिहिण्यासाठी प्रखर बुद्धिमत्तेची आवश्यकता असते. असे असले तरी सामान्य वाचक ध्यानात घेऊन कथा लिहिलेली असते.
८. सामान्य वाचक लक्षात घेऊन विज्ञान कथेची भाषा साधी सोपी आणि सरळ असावी.

**निष्कर्ष :**

एकदंरीत विज्ञान साहित्य ज्या साहित्यप्रकारातून निर्माण झाले त्यासंबधीचा विचार केला असता कादंबरी साहित्यप्रकारातून कथेच्या तुलनेत कमी लेखन केले गेले आहे. कादंबऱ्यांची संख्या कथेच्या तुलनेत खूपच कमी असल्याचे ध्यानात येते. विज्ञान साहित्यप्रकाराविषयी एवढेच म्हणता येईल की, कालौघात सर्व साहित्यप्रकार लुप्त होतील पण प्रीतिकथा, गूढकथा, रहस्यकथा, सामाजिक कथा, ऐतिहासिक कथा, भयकथा, विनोदी कथा, इत्यादी कथा सर्व कथाप्रकारांना आपल्यात सहजी सामावून घेणाऱ्या कथेला मरण नाही कारण ती भविष्यच घडवित असते. त्यांना उद्याला कोणतीच मर्यादा नाही. विज्ञानाचा विकास म्हणजे वैज्ञानिक ज्ञानाचा विकास. हा विकास जसा बौद्धिक जिज्ञानेतून होतो तसाच समाजाच्या भौतिक गरजांमुळे होतो. माणसाच्या भौतिक गरजा, शारीरिक गरजा, शारीरिक रोगापासून मुक्ती, माणसाच्या आर्थिक उन्नती यांच संबंध वैज्ञानिक प्रगतीशी आहे. माणसाच्या सर्व सामाजिक अंगाच्या विकासासाठी वैज्ञानिक आवश्यक आहे ठरला. विज्ञानानं तंत्रज्ञानाची उभारणी केली तसा माणसाच्या जगण्याचा पोतही सुधरत जातो.

**संदर्भ :**

१. पाटील चंद्रकांत, आणि तोपर्यंत, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.२००१, प.क्र.१६६.
२. तत्रैव, पृक्र. १६७.
३. कुलकर्णी व. दि., घाटे निरंजन, (संपा), विज्ञानासाहित्य आणि संकल्पना, निहारा प्रकाशन, पुणे. पृ.क्र. ४.
४. संपा.कुळकर्णी,अ.वा, महाराष्ट्र साहित्य परिषद,जावडेकर, सुबोध, विज्ञानाला मानवी चेहरा द्यायचा प्रयत्न, महाराष्ट्र साहित्यपत्रिका क्र.३०१, एप्रिल-मे-जून २००२, पृ.क्र. ४७.